**प्रसिध्दी पत्रक** दिनांक : ०२/११/२०२३

**सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिक्षक अभियंता गजेंद्र राजपुत व वरिष्ठ लिपिक विनोद कंधारे यांनी रस्त्याच्या कामाचे टेंडरचे निविदा मंजुर करून देण्याकरीता तक्रारदार यांच्या जवळुन ६,४०,०००/– रूपयांची लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे. भाग्यनगर गुरनं ४०३/२०२३ कलम ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ |
| गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक ०१.११.२०२३ रोजी ०६.२३ वा. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | १) गजेंद्र हिरालाल राजपुत, वय ५४ वर्षे, पद अधीक्षक अभियंता, (वर्ग–१) नेमणूक सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड.<br>२) विनोद किशनराव कंधारे, वय ४७ वर्षे, पद वरिष्ठ लिपिक, (वर्ग –३), नेमणूक सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ७,५०,०००/– रूपये |
| लाच स्विकारली रक्कम | ६,४०,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांना केदारगुडा, पिंगळी, डोंगरगाव, हदगाव, गोरलेगाव, गुरफळी रोड ता. हदगाव, जि. नांदेड या रस्त्यांचे दोन कामांचे टेंडर मिळाले आहे. सदर कामाच्या निवीदा स्विकृतीचे शिफारसीसाठी तक्रारदार हे आलोसे क्र. १) गजेंद्र राजपुत, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना भेटले असता, त्यांनी मंजुर झालेल्या दोन टेंडरचे एकुण १४ कोटी १० लाख रूपयाचे अर्धा टक्के रक्कम असे सरसकट ७ लाख रूपयाची मागणी केली व सदर पैसे दिले तर पुढे मुख्य अभियंता, नांदेड यांच्याकडे शिफारस करतो असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार हे संबंधीत टेबलचे लिपिक श्री विनोद कंधारे यांना भेटले असता, त्यांनी त्यांचे व त्यांचेसोबत असलेले लिपीक श्री जयंत धावडे यांच्यासाठी प्रत्येक टेंडरचे २५०००/– रूपये असे एकुण ५०,०००/–रूपयाची मागणी केली. सदरचे पैसे हे लाच असल्याची तक्रारदार यांना खात्री झाल्याने त्यांना ती देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे तक्रार दिली.<br>त्यानंतर दि.३१.१०.२०२३ रोजी व दि.०१.११.२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पथकाने तक्रारदार यांना लाच मागणी पडताळणीसाठी पाठविले असता, तक्रारदार यांनी गजेंद्र हिरालाल राजपुत, वय ५४ वर्षे, पद अधीक्षक अभियंता, (वर्ग–१) नेमणूक सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांची भेट घेतली व सात लाख रूपये जास्त होत आहेत. काही तरी कमी करा अशी विनंती केली असता, अधीक्षक अभियंता श्री राजपुत यांनी तडजोडीअंती सहा लाख रूपयाची पंचासमक्ष मागणी केली व सहा लाख रूपये संबंधीत लिपीक कंधारे यांच्याकडे देण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार हे संबंधीत लिपीक कंधारे यांच्याकडे गेले व राजपुत साहेबांनी सहा लाख रूपये तुमच्याकडे देण्यास सांगितले व त्यांना दोन टेन्डरचे प्रत्येकी २००००/– असे एकुण ६ लाख ४० हजार घेण्यास वरिष्ठ लिपिक विनोद कंधारे यांनी पंचासमक्ष होकार दर्शविला.<br>त्यानंतर दि. ०१.११.२०२३ रोजी सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेडचे कार्यालयात तक्रारदार यांच्याकडून ६ लाख गजेंद्र हिरालाल राजपुत, वय ५४ वर्षे,पद अधीक्षक अभियंता, (वर्ग–१) यांच्यासाठी व आलोसे विनोद केशवराव कंधारे, वय ४७ वर्षे, पद वरिष्ठ लिपिक, (वर्ग–३), नेमणूक सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्यासाठी दोन टेंडरचे ४० हजार रूपये असे एकुण ६ लाख ४० हजार पंचासमक्ष लाच स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.<br>दरम्यान आलोसे क्रमांक १) गजेंद्र राजपूत, अधीक्षक अभियंता, वर्ग–१ यांचे कार्यालय व घर झडतीतून लाचलुचपत प्रतिबंधक नांदेड पथकाने पंचासमक्ष एकूण ७२,९१,४९० रुपये जप्त केले आहेत.<br>दोन्ही लोकसेवकांना ताब्यात घेण्यात आले असुन वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| सापळा पथक | सदरची कार्यवाही ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड चे डॉ.श्री राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली, पर्यवेक्षण अधिकारी श्री राजेंद्र पाटील पोलीस उप अधीक्षक, श्री अनिल कटके, पोलीस उप अधीक्षक, श्री गजानन बोडके, पोलीस निरीक्षक, सपोउपनि श्री गजेंद्र मांजरमकर,पोह/ज्ञानेश्वर पंचलिंगे, तानाजी मुंढे, गजानन पवार, नापोह/शेख अकबर, पोना/राजेश राठोड, पोकॉ/अरशद खान, ईश्वर जाधव, चापोना/गजानन राउत, प्रकाश मामुलवार सर्व लाप्रवि नांदेड परिक्षेत्र |
| गुन्हयाचा तपास | श्री राजेंद्र पाटील पोलीस उप अधीक्षक, अँटी करप्शन ब्युरो, नांदेड |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड नागार्जुनसागर बिल्डींग स्नेहनगर/श्रीनगर नांदेड

**संपर्क कमांक :– 02462–253512**

**टोल फ्री कमांक– 1064**

**मा. पोलीस अधीक्षक 9623999944**

**ई–मेल आयडी**

spacbnanded@mahapolice.gov.in

**FACEBOOK – Dysp Acb Nanded**

**ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net**

**पोलीस उपअधीक्षक 7350197197**

**ई–मेल आयडी**

dyspacbnanded@mahapolice.gov.in

**TWITTER - @ACBnanded**

**INSTAGRAM – acb_nanded**


पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner